**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **वेगानं बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात नागरिकांनीही स्वत: अद्ययावत राहण्याची गरज- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे रोजगार मेळाव्यात प्रतिपादन, नागपूरातील रोजगार मेळाव्यात 250 नवनियुक्तांना नियुक्तीपत्र प्रदान.**
2. **प्री-प्रायमरी स्कूल वर नियंत्रण ठेवणारा कायदा राज्य सरकार आणणार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांची नागपुरात माहिती.**
3. **काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या बैठकीनंतर चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ता स्थापनेबाबत काँग्रेसमध्ये तोडगा निघाला असल्याचे विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केले स्पष्ट.**
4. **येत्या प्रजासत्ताक दिनी राज्यातील सर्वोत्कृष्ट कार्यालयांची नावे जाहीर करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**

---

रोजगार मेळावा

वेगानं बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात नागरिकांनीही स्वत: अद्ययावत राहण्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. आज देशभरात झालेल्या अठराव्या रोजगार मेळाव्यात ते दूरदृष्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. शासकीय अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांनी नागरिक देवो भव हा मंत्र लक्षात ठेवून कार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. देशात उद्योग क्षेत्रात मोठी वाढ होत असून, रोजगाराच्या संधी वाढत आहेत, देशवासियांच्या क्रयशक्तीतही मोठी वाढ झाली असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले...

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २८ सेकंद )***

***ये विकसित भारत के निर्माण को गति देने का संकल्प पत्र है। आप में बहुत सारे साथी देश की सुरक्षा को मजबूत करेंगे। हमारे एजुकेशन और हेल्थ केयर इकोसिस्टम को और सशक्त करेंगे। कई साथी वित्तीय सेवाओं और एनर्जी***

***सिक्योरिटी को मजबूती देंगे तो कई युवा हमारी सरकारी कंपनियों की ग्रोथ में महत्वपूर्ण भूमिका निभाएंगे।***

रोजगार मेळाव्यात अंतर्गत नागपुरात हिंगणा इथं केंद्रीय राखीव पोलिस दल - सीआरपीएफचे नागपूरचे उपमहानिरिक्षक अनिल कुमार यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वितरण करण्यात आलं. मेळाव्यात 250 नवनियुक्तांना नियुक्तीपत्र वितरण करण्यात आलं. याप्रसंगी संबोधित करताना अनिल कुमार यांनी नवनियुक्तांना आवाहन केले की इमानदारी निष्ठा कर्तव्य पारायणता या गुणांसोबत आपल्याला देशसेवेचे एक प्रहरी बनायचे आहे.

*(होल्ड बाईट - डीआयजी 11 सेकंद )*

***आज से आप केवल कर्मचारी नहीं, बल्कि देश सेवा के सिपाही बन रहे हैं। देश की सुरक्षा, समाज की शांति और नागरिकों के विश्वास को बनाए रखना आपकी प्रमुख दायित्व रहेगा।***

निवड झालेले हे नवनियुक्त कर्मचारी सीआरपीएफ, एमएसीएल सीमा सुरक्षा दल, बँक तसेच केंद्र शासनाच्या विविध विभागात कार्यभार स्वीकारतील. याप्रसंगी सीआरपीएफ मध्ये नुकतीच निवड झालेल्या नागपूर मधील शिरसी गावातील रोशन या युवकाने या मेळाव्याप्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त केली.

*(होल्ड बाईट - नवनियुक्त 15 सेकंद)*

***मित्रांनो, माझे पूर्ण नाव रोशन रामेश्वर शेंडे. मी मुळचा शिरसी गावातील आहे, नागपूर जिल्ह्यातील. चार वर्ष सतत मी मेहनत करत होतो. कुठं एक मार्काने दोन मार्काने राहत होतो तर शेवट आज दोन हजार सव्वीस मध्ये माझा सिलेक्शन झाला सीआरपीएफ मध्ये आणि मी भारत सरकारचं खूप खूप धन्यवाद करतो.***

देशभरात ४५ ठिकाणी हा मेळावा झाला. यात नवी दिल्ली, मुंबई, नागपूर, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, तिरुवनंतरपुरम, भुवनेश्वर आदी शहरांचा समावेश आहे. पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप झालं.

---------------------------------------

रेल्वे रद्द

दौंड-काष्टी विभागामध्ये सुरू असलेल्या दुहेरीकरण कामांमुळे तसेच आवश्यक अभियांत्रिकी कामांसाठी घेतल्या जाणाऱ्या वाहतूक ब्लॉकच्या पार्श्वभूमीवर काही

एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये आज नागपूर-पुणे एक्सप्रेस पुणे-अजनी हमसफर एक्सप्रेस तर उद्या पुणे-नागपूर एक्सप्रेस आणी अजनी-पुणे एक्सप्रेस यांचा समावेश असून प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन करताना अधिकृत रेल्वे चौकशी माध्यमांद्वारे गाडीच्या ताज्या स्थितीची माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

---------------------------------------

प्री-प्रायमरी स्कुल

बदलापूरमध्ये प्री-प्रायमरी स्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर बलात्काराची घटना घडल्यानंतर त्या चालकावर कारवाई करण्यात आली असून, त्या स्कुल वॅनचा परवाना देखील रद्द करण्यात आला आहे. परंतु अशा प्री-प्रायमरी स्कूलच्या नियंत्रणाबाबत सरकार गांभीर्याने विचार करत असून, लवकरच यासंदर्भात कायद्याचा मसुदा अभ्यास गटाद्वारे तयार करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली..

***(होल्ड बाईट - भोयर 27 सेकंद)***

***परंतु शाळेवर कारवाई करायची झाल्यास अजूनपर्यंत प्री प्रायमरी स्कूल ह्या शासनाच्या अखत्यारीत असण्यास संदर्भात त्या ठिकाणी काही प्रोव्हिजन नव्हते. ही बाब माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आपण साधारणतः सात आठ महिने आधी आणून दिली आणि त्यांनी तातडीने प्री प्रायमरी स्कूलच्या संदर्भात एक नवीन कायदा तयार करण्यासाठी शासनाला सूचना दिलेल्या आहेत. लवकरात लवकर ह्या संदर्भात कायदा तयार करून राज्यातल्या सगळ्या प्री प्रायमरी स्कूल ह्या शासनाच्या अखत्यारीमध्ये येतील.***

---------------------------------------

अकोला मनपा

अकोला महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे गणित अखेर जुळले असून, भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली ‘शहर सुधार आघाडी’ स्थापन करण्यात आली असून गट स्थापनेसंदर्भातील पत्र अमरावती विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आले आहे. महापालिकेतील एकूण संख्याबळ पाहता भाजपकडे ३८ नगरसेवक आहेत. त्यांना शिंदे गट (१), अजित पवार गट (१), शरद पवार गट (३) व शहर विकास

आघाडी (१) यांचे पाठबळ मिळाल्याने एकूण संख्याबळ ४४ वर पोहोचले असून स्पष्ट बहुमत पूर्ण झाले आहे. दरम्यान, दिवसभर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, काँग्रेस आमदार साजिद खान पठाण तसेच उबाठाचे आमदार नितीन देशमुख यांच्याकडून सत्तास्थापनेसाठी प्रयत्न सुरू होते. मात्र, संध्याकाळी भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी "आमच्याकडे बहुमत असून भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार आहे," असा दावा माध्यमांशी बोलताना केला.

---------------------------------------

चंद्रपूर मनपा सत्तास्थापना

चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ता स्थापन करण्याबाबत काँग्रेस  अंतर्गतसुरू असलेल्या संघर्षावर तोडगा निघाला असून महापौरपदी कुणाची निवड होईल, हे खासदार प्रतिभा धानोरकर ठरवणार असून स्थायी समितीचा निर्णय आपण घेणार असल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्ता स्थापनेबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यात हा निर्णय झाल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं. यानुसार गटनेत्याची निवड प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सल्ल्यानुसार होणार आहे. पक्षाचा नेता म्हणून संयमी भूमिका घ्यावी लागते,कोणी टीका केली, शिव्या दिल्या तरी आपले काम करावे लागते.यावेळी देखील पक्षासाठी दोन पावले मागे घेतल्याचे  वडेट्टीवार यांनी नागपुरात प्रसार माध्यमांना उत्तर देताना स्पष्ट केले. चंद्रपुरात उद्भवलेल्या स्थितीत भाजपने सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या असून नगरसेवकांना विविध प्रलोभने दिली जात आहे. नगरसेवकांना एक कोटी  रुपये, पद देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला.

---------------------------------------

केंद्रीय आरोग्य आयुष मंत्री /शेगाव

बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव रेल्वे स्थानकावर नवीन आणि अत्याधुनिक उपहारगृहाचे लोकार्पण केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते संपन्न झालं. यावेळी या नवीन सुविधेबद्दल त्यांनी माहिती दिली-

***(होल्ड बाईट - केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव ३६ सेकंद)***

***याच्यामध्ये रेल्वेच्या बोगी मध्येच ह्या सगळ्या सुविधा देण्याचं काम. या ठिकाणी चहा असेल, नाश्ता असेल, जेवण असेल सगळ्या प्रकारचा आणि त्याला लूकही असं दिलेला आहे की जणू आपण रेल्वे स्टेशनवर बसून रेल्वे मध्ये बसून आपण हे सगळं याचा सगळा आनंद घेत आहोत अशा प्रकारचा सगळा लूक याला दिलेला आहे. एकीकडे ओरिजिनल रेल्वेचा प्लॅटफॉर्म आहे. दुसऱ्या बाजूला सुद्धा वंदे भारत चा लूक तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे एक लोकांना एक वेगळा आनंद या ठिकाणी येऊन चहा नाश्ता घेण्याचा मिळणार आहे तर, आज त्याचं रितसर असं उद्घाटन आज शेगाव नगरीमध्ये संपन्न होत आहे.***

----------------------------------------

१५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सरकारी कार्यालयांची नावं येत्या सोमवारी प्रजासत्ताक दिन सोहळ्यात जाहीर करण्यात येतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत विविध १० स्तरांवर शासकीय कार्यालयांचं मूल्यमापन संकेतस्थळ, ई ऑफिस, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, एआय ब्लॉक चेनचा वापर अशा विविध निकषांवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयांचं मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे करण्यात येत आहे. त्यात सर्वोत्कृष्ट प्रत्येकी ५ जिल्हाधिकारी कार्यालयं, पोलीस अधीक्षक कार्यालयं, महानगरपालिका, ७ राज्यस्तरीय आयुक्तालयं, संचालनालयं, मंडळं, महामंडळं, निमशासकीय, संस्था शासकीय कंपन्या इत्यादींची निवड केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे ही माहिती दिली आहे.

----------------------------------------

हवामान

विदर्भात थंडीचा जोर कमी होत असून आज सर्वात कमी तापमान यवतमाळ जिल्ह्यात ११.४ अंश से.इतकं नोंदवण्यात आलं तर वाशीम जिल्ह्यात सर्वात जास्त ३१ अंश सेल्शियस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

----------------------------------------

जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शन

ऑरगॅनिक पिकांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असून या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी लवकरच ऑरगॅनिक फार्मर मार्केट ही

संकल्पना वर्धा शहरांमध्ये अस्तित्वात आणून ऑरगॅनिक शेतकर्यांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणार असल्याच  वर्ध्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

---------------------------------------